राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत
मौ.मेंढला (खु.),ता.अर्धापुर,जि.नांदेड येथील
नळ पाणी पुरवठा योजनेच्या कामास सुधारीत
प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांकः सुप्रमा-२०१९/प्र.क्र.३५/पापु-१८

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
तारीख: ०२ मार्च, २०१९

वाचा-

१) ग्रामपंचायत मौ.मेंढला (खु.),यांचे पत्र क्र. जा.क्र ग्रापका/ग्रा.से./१/२०१४,दि.२५/८/२०१४
२) कार्यकारी अभियंता,ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,जि.प.नांदेड यांचे तां.मा. क्र.४३४, दि.४/८/२०१४
३) शासन पत्र क्रमांकः पापुयो-२०१८/प्र.क्र.२५४/पापु-१८,दि. १५/१०/२०१८
४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांचे पत्र क्र.जा. क्र. जिपनां /ग्रापापुवि / ५९, दि.१०/१/२०१९

प्रस्तावना-

मौ.मेंढला (खु.),ता.अर्धापुर,जि.नांदेड येथील नळ पाणी पुरवठा योजनेच्या अंदाजपत्रकास संदर्भ क्र.१ अन्वये मुळ प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.संदर्भ क्र.२ अन्वये कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,जिल्हा परिषद,नांदेड यांनी मुळ तांत्रिक मान्यता दिलेली आहे. तथापि, सदर योजनेच्या कामात जादा दराच्या निविदा स्विकृत केल्यामुळे खर्चात वाढ झाली आहे. सदर योजनेच्या जादा दराच्या निविदेस संदर्भ क्र.३ अन्वये शासनाची मंजूरी घेण्यात आलेली आहे. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,जिल्हा परिषद,नांदेड यांनी सुधारीत अंदाजपत्रकास "Technically approved" केले आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांच्या संदर्भ क्र.४ अन्वये योजनेच्या सुधारीत अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

मौ.मेंढला (खु.),ता.अर्धापुर,जि.नांदेड येथील नळ पाणी पुरवठा योजनेच्या रु. ५३.४६/- (ढोबळ) लक्ष (अक्षरी त्रेपन्न लक्ष शेहेचाळीस हजार रुपये फक्त) एवढ्या सुधारीत किंमतीच्या अंदाजपत्रकास पुढील अटींच्या अधीन राहुन सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

१) सदर योजनेस सुधारीत तांत्रिक मान्यता देण्यात यावी.
२) ही योजना जिल्हा परिषदेमार्फत कार्यान्वित करण्यात येईल.
३) या योजनेच्या मुळ प्रशासकीय मंजूरी दिलेल्या शासन निर्णयातील व तांत्रिक मान्यतेच्या आदेशातील अटीं व शर्तीचे काटेकोरपणे पालन करावे.
४) सन २०१३ मधीव CAG यांच्या अहवालानुसार राज्यातील २१ टक्के पाणी पुरवठा योजना या देखभाल दुरुस्ती अभावी वीजदेयक न भरल्यामुळे बंद पडल्या असल्याचे दिसुन येते.त्यामुळे सदर योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम राहण्यासाठी पाणी पट्टी दरामध्ये आवश्यकतेनुसार वेळोवेळी वाढ करण्यात यावी.
५) ही योजना पुर्ण झाल्यावर ती संबंधीत ग्रामपंचायतीच्या ताब्यात देण्यात यावी. संबंधीत कार्यकारी अभियंता,ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,जि.प.नांदेड यांचेकडून योजना प्रत्यक्षात पुर्ण झाली आहे. या आशयाची सुचना मिळाल्याच्या दिनांकापासुन १ महीन्याच्या आत योजना ताब्यात घेण्यास संबंधीत ग्रामपंचायत/ जिल्हा परिषद जबाबदार राहील. योजना प्रत्यक्षात पुर्ण झाल्यावर लगेच संबंधीत कार्यकारी कार्यकारी अभियंता,ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,जि.प.नांदेड,संबंधीत ग्रामपंचायत अधिकारी व कंत्राटदार योजनेची संयुक्त पाहणी आयोजित करावी. पाहणीत कोणतेही दोष आढळुन आल्यास योजना ताब्यात देण्यापुर्वी सुधारण्यात यावी.
६) योजना राबविणे ,त्यांचे परिरक्षण,दुरुस्त्या विशेष दुरुस्त्या धरुन यासाठी दरवर्षी येणारा आवर्ती खर्च भागविण्यासाठी,योजनेत घसारा किंवा यंत्रसामुग्री नुतनीकरणासाठी संबंधित ग्रामपंचायतीस/जिल्हा परिषदेस शासनाकडून कोणतीही मदत/ अनुदान मिळणार नाही.
७) हागणदारीमुक्तीबाबत प्रचलित धोरणानुसार कार्यवाही करण्यात यावी.
८) योजना पुनर्सुधारीत होणार नाही, याची जबाबदारी जिल्हा परिषदेची राहील.
९) योजनेची उर्वरीत कामे ६ महीन्यात पुर्ण करण्यात यावी.

०२. या योजनेच्या सुधारीत किंमतीतील वाढीव खर्च रु. ४.५३/- लक्ष (अक्षरी चार लक्ष त्रेपन्न हजार फक्त) हा राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाखालील राज्य हिश्यातुन/जिल्हा नियोजन मंडळाकडून/किमान गरजा कार्यक्रमांतर्गत उपलब्ध होणाऱ्या निधीतुन करण्यात यावा

०३. प्रस्तुत योजनेस सुधारीत प्रशासकीय मान्यता ही वित्त विभागाच्या दि. १७/०४/२०१५ च्या क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियमन भाग-२ या शासन निर्णयातील भाग पहीला, उपविभाग-३ मधील अ.क्र. ६ (सहा) परिच्छेद क्र. २७ (अ) अनुसार विभागास प्रदान करण्यात आलेल्या प्राधिकारानुसार देण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३०२१४३११९३१२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Suresh Sawairam Rathod

Digitally signed by Suresh Sawairam Rathod
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply and Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e695ebef4b8a6c860bec48f3ef34f42f0c13f8d1aa06f854d5b9bd6874084124, serialNumber=bcaaf1242528ff3cdece2c8eb03929321c1c09c0a7c4d906e3b8a47677ad9769, cn=Suresh Sawairam Rathod
Date: 2019.03.02 14:33:13 +05'30'

(सु.स.राठोड)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.मंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता.
२) मा.राज्यमंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता.
३) मा.विरोधी पक्षनेता,महाराष्ट्र विधानसभा/विधान परिषद
४) मा.विधानमंडळ सदस्य (सर्व)
५) सदस्य सचिव,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,मुंबई.
६) मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,नांदेड
७) महालेखापाल,लेखा परिक्षा,महाराष्ट्र-२,नागपुर
८) महालेखापाल,लेखा परिक्षा,महाराष्ट्र-१,मुंबई
९) संचालक,पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था (वासो),बेलापुर,नवी मुंबई.
१०) मुख्य अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,औरंगाबाद.
११) अधीक्षक अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधीकर,नांदेड
१२) कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,नांदेड
१३) संचालक(वित्त),महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,सिडको भवन,बेलापुर,नवी मुंबई.
१४) उपसंचालक,भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,औरंगाबाद.
१५) वरिष्ठ भुवैज्ञानिक,भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,औरंगाबाद.

१६) कार्यकारी अभियंता,ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,जिल्हा परिषद,नांदेड
१७) अतिरीक्त मुख्य सचिव,नियोजन विभाग यांचे स्वीय सहायक,मंत्रालय,मुंबई.
१८) अपर मुख्य सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे स्वीय सहाय्यक,मंत्रालय,मुंबई
१९) प्रधान सचिव,वित्त विभाग यांचे स्वीय सहाय्यक,मंत्रालय,मुंबई.
२०) मु.अ.तथा वि.का.अ. ,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे स्वीय सहाय्यक,मंत्रालय,मुंबई.
२१) कार्यासने (पापु-०४,०६,०७,०९,१०,१३,१७ व २०),पा.पु.व स्व.वि.,मंत्रालय,मुंबई.
२२) निवडनस्ती कार्यासन पापु-१८.